**विषय:- स्नेहनगर पोलीस वसाहत येथील पोलीस कल्याण निधी अंतर्गत असलेले गाळे व्यापाराकरीता भाडयाने देणेबाबत.**

स्नेहनगर पोलीस वसाहत येथील गाळे हे दोन प्रकारचे असून मोठा गाळा साधारणत: ३०० स्क्वेअर फुट व लहान गाळा २७५ स्क्वेअर फुट असून गाळयास प्रति महा रू.१५०००/- व रू. १३०००/- भाडे असेल आणि प्रति गाळा रू.६,००,०००/- (अक्षरी:- सहा लाख रू.) अनामत रक्कम राहील. नांदेड जिल्हयात कार्यरत अधिकारी अंमलदार यांचे पाल्यांसाठी प्रति महा गाळा भाडे रू.१३०००/- व रू. ११०००/- असेल आणि प्रति गाळा रू.३,००,०००/- (अक्षरी:- तीन लाख रू.) अनामत रक्कम राहील. अर्जदार यांनी मा. पोलीस अधीक्षक नांदेड यांचे नावे दिनांक २४/१२/२०२२ ते दिनांक १०/०१/२०२३ पर्यंत अर्ज करावे आणि अर्ज करीत असतांना व्यवसाय व व्यवसायासंबंधी आवश्यक असलेले कागदपत्र सादर करावे. सदर कालावधीत प्राप्त झालेल्या अर्जांचाच विचार करण्यात येईल.